विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र

# ११ वे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन

राहुरी, जि. अहमदनगर

१९ व २० जानेवारी, २013

## अध्यक्षीय भाषण



प्रा. डॉ. बाबुराव गुरव

राहुरी या इतिहाससंपन्न, पुरोगामी परंपरासमृद्ध नगरीत महात्मा फुले आणि संत गाडगे महाराज यांच्या साहित्य नगरीत संपन्न होत असलेल्या, १९, २० जानेवारी २०१३ रोजीच्या, विद्रोही सांस्कृतिक चळवळ महाराष्ट्र या संघटनेने, परिवर्तनाच्या क्रांतिकारी सांस्कृतिक प्रवाहाने, एकविसाव्या शतकातील पर्यायी सांस्कृतिक दिशेच्या प्रकाशवाटेने, सम्यक दृष्टीच्या आजच्या समाज वैज्ञानिक मांदियाळीने, संघटित केलेल्या विद्रोही सांस्कृतिक साहित्य संमेलनाच्या विचारमंचावर विवेकसमुहात, कृतीशील नवसर्जक कलावंत मेळाव्यात, या समतेच्या युगदिंडीत सहभागी असलेले संमेलनाचे उद्घाटक, भालकी मठाचे मार्गदर्शक बसवण्णांचे कृतीशील वारस, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखक, विचारवंत डॉ. स्वामी बसवलींग पट्टदेवरू, विचारमंचावर आणि सभास्थीत मान्यवर, या संमेलनाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष आणि मानव मुक्तीच्या चळवळीचे जीवनदानी युवक नेते डॉ. जालिंदर घिगे, त्यांचे सहकारी आयोजन समितीचे सचिव प्रा. भास्कर बुलाखे, खजिनदार सचिन भालेराव, त्यांचे संयोजन सामितीचे सर्व सहकारी, या संमेलनाच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य, मार्गदर्शन, हितचिंतन करणारे, संमेलनाच्या अध्यक्षांचे गावोगावी स्वागत करून ही सांस्कृतिक प्रबोधनप्रक्रिया गतिमान करणारे, महाराष्ट्राच्या भगिनी, बंधू आणि विचार कृती सहयात्री आपणा सर्वांना क्रांतिकारी विनम्र अभिवादन!

मी सुरुवातीला फुले, शाहू आंबेडकरांच्या प्रकाशयात्रेचे पूर्वसुरी महाबोधी गौतम बुद्ध, महावीर, चार्वाक, निस्सार, दिग्नाग, अश्वघोष, धम्मकिर्ती, शेतकऱ्यांचा राजा बळीराजा, येशू ख्रिस्त, म. पैगंबर, बसवण्णा, चक्रधर, नामदेव, ज्ञाननाथ, चोखा मेळा, छ. शिवाजी महाराज, जिजाऊ, संत तुकाराम, अठरापगड जातीचा संतमेळा, सावित्रीबाई फुले, कार्ल मार्क्स, शहीद भगतसिंग, म. फुलेंचे अनूचर शाहू राजे, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, महर्षि वि. रा. शिंदे, संत गाडगे बाबा, साने गुरुजी, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. भास्करराव जाधव, क्रांतीवीर पद्मभूषण डॉ. नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड, शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे. मॅडम फरेरा, बिरसामुंडा, तंट्या मामा भिल्ल, भागोजी नाईक, उमाजी नाईक, अच्युतराव पटवर्धन या आंतरभारतीय एकतेच्या प्रणेत्यांचे स्मरण करतो, त्यांना विनम्र क्रांतिकारी अभिवादन करतो.

ही राहुरीची नगर जिल्ह्याची माती इतिहाससिद्ध क्रांतिभूमी आहे. या मातीने मानववंशाच्या विकासाच्या प्रक्रियेला भारतीय स्वातंत्र्य चळवळीला, कष्टकऱ्यांच्या चळवळीला अनेक हुतात्मे नेते, कार्यकर्ते दिले आहेत. इथल्या स्त्रीपुरुषांनी क्रांतिकारी समतेची, सहकाराची, उत्पादनवाढीची, लोकशाहीची चळवळ सतत खांद्यावर घेतली आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या, आंबेडकरी प्रेरणेच्या, शिक्षणाच्या चळवळीतील या जिल्ह्याचे स्थान फारच वरचे आहे. नगरच्या किल्ल्याने राष्ट्रीय नेते पाहिले. इथल्या पुरोगामी जनतेने १९५७ साली ॲड. बी. सी. कांबळे यांना पार्लमेंटमध्ये पाठविले. भारतातला पहिला सहकारी साखर कारखाना उभारला. नगर जिल्ह्याची विद्रोही परंपरा अभिमान वाटावी अशी प्रकाशमान आहे. राहुरी असूर राहुशी संबंधित आहे. सिंधू संस्कृतीशी नाते सांगणारी जोर्वे संस्कृती दायमाबाद तालुका श्रीरामपूर येथे वसते आहे. संत गाडगेबाबांनी पहिली आश्रमशाळा राहुरीतच सुरू केली. भारताच्या कृषी संस्कृतीचा संशोधित विकास करणारे आणि महात्मा फुले यांचे स्मारक ठरलेले राहुरी कृषी विद्यापीठ जगप्रसिद्ध आहे. लक्ष्मीबाई टिळक, संत महीपती, नागदेवाचार्य (डोमेगाव), ज्ञानानाथांचे नेवासा, गुरू गोविंदसिंहांच्या पाठीवर शक्ती घेवून उभे राहिलेले भिंगार, शहा शरीफजी यांची कर्मभूमी, हणमंत नाईक, भागोजी नाईक यांचे बलिदान क्षेत्र संगमनेर, क्रांतीवीर राघोजी भांगरे यांचे अकोले, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या अस्थिंचे जतन करणारे बोधेगाव, शेख महंमदांचा श्रीगोंदा, अहिल्यादेवी होळकरांचे गाव चौंडी, भास्करराव जाधव, दादासाहेब रूपवते यांचे कार्यक्षेत्र नगर, चाँदबीबीने लढवलेला, स्वातंत्र्य चळवळीची धग सहन केलेला नगरचा किल्ला, कानिफनाथांची मढी, दीनमित्र मुकुंदराव पाटील यांची तरवडी, मौलाना आझादांच्या गुब्बारेखतिफ या ग्रंथाचे जन्मस्थान नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या थॉट ऑन पाकिस्तान या ग्रंथाचे जन्मस्थान नगरचा पटवर्धन वाडा, वेठबिगारी नाकारणारे हरगाव, डिस्कव्हरी ऑफ इंडिया या पंडीत नेहरूंच्या ग्रंथाचे जन्मस्थान नगरचा किल्ला. रयत शिक्षण संस्थेचा स्वावलंबी शिक्षणाचा प्रवाह झोपडी झोपडीत पोहोचविणारा ग्रामीण भाग. साखर कामगार, वीज कामगार, धरणग्रस्त यांच्या राष्ट्रीय पातळीवरच्या चळवळींचे नेतृत्व करणारा जिल्हा. उद्याच्या जागतिक लढ्यातल्या सांस्कृतिक लढ्यातले वैज्ञानिक रोप जोपासायला, वाढवायला, ब्राह्मणशाही, भांडवलशाहीचा लोकशाही मार्गाने पराभव करायला ही राहुरी, नगरची भूमी सक्षम आहे असे क्रांतिकारी चळवळींचा छोटा अभ्यासक या नात्याने माझे मत आहे. मी या भूमीला, इथल्या पुरोगामी इतिहासाला मी विनम्र अभिवादन करतो.